# <u>पुणे लोहगांव व राष्ट्रीय संरक्षण अकादमी खडकवासला विमानतळ परिसरातील बांधकाम करणेसाठी संरक्षण विभागाचे उंचीबाबत नाहरकतपत्र मिळणेबाबतची कार्यप्रणाली.</u>

नागरी विमान वाहतूक मंत्रालय, भारत सरकार यांनी विमानांची सुरक्षितता व त्यांची उड्डाणे इ. क्रियाकलाप व्यवस्थित होणेच्या दृष्टीने अंतरराष्ट्रीय मानांकने व नियम विचारात घेवुन G.S.R.751E दि.३०/०९/२०१५ रोजी सूची तयार करून ती राजपत्रात प्रकाशित केली आहे.

या नोटीफिकेशनच्या आधारे भारतीय वायुदलाने पुणे विमानतळ व खडकवासला येथील विमानतळाच्या अनुषंगाने कलर कोडेड मॅप (सी.सी.झेड.एम.) व त्यासोबत काही सूचना प्रकाशित केल्या आहेत. या कलर कोडेड मॅप/सी.सी.झेड.एम. व सूचनांची प्रत **<u>जोडपत्र पी१</u>** म्हणून सोबत जोडण्यात आली आहे.

या नकाशामध्ये विमानतळ भोवतालचा परिसर हा लाल, निळा, गुलाबी, पिवळा व हिरवा या रंगांमध्ये विभागून दर्शविण्यात आलेला आहे. या प्रत्येक विभागामध्ये समुद्र सपाटीपासून जास्तीत जास्त किती उंची पर्यंत एखाद्या इमारतीचे बांधकाम/मनोरा इ. उभारणी करणेस परवानगी आहे, हे नमूद करण्यात आलेले आहे. एखाद्या व्यक्तिस या नकाशामध्ये नमूद केलेल्या उंची पेक्षा जास्त उंच बांधकाम करावयाचे असल्यास पुणे महानगरपालिकेकडे बांधकाम परवानगीच्या प्रस्तावासोबत भारतीय वायुदल विभागाने अदा केलेले उंचीबाबतचे ना-हरकत पत्र दाखल करणे अनिवार्य आहे. तसेच जर मिळकत ही सी.सी.झेड.एम. मधील लाल व निळ्या रंगाने दर्शविण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये येत असेल तर ना-हरकत पत्र (समुद्रसपाटीपासूनची इमारतीची उंची विचारात न घेता ) दाखल करणे बंधनकारक राहील.

नागरीकांच्या माहितीसाठी खाली नमूद केलेल्या तक्त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेच्या हद्दीची कलर कोडेड मॅप मध्ये विभाजन आहे.

| अ.क्र. | विभाग | गावाचे नाव | शेरा |
|---|---|---|---|
| १) | लाल रंग | लोहगांव | संपुर्ण गांव |
| | | धानोरी | संपुर्ण गांव |
| | | कळस | संपुर्ण गांव |
| | | शिवणे | संपुर्ण गांव |
| | | वारजे | संपुर्ण गांव |
| | | येरवडा | अंशत: |
| | | वडगांवशेरी | अंशत: |
| | | खराडी | अंशत: |
| | | बावधन खु. | अंशत: |
| | | कोथरूड | अंशत: |
| | | धायरी | अंशत: |

| | | | |
|---|---|---|---|
| | | वडगांव खु. | अंशत: |
| २) | पिवळा रंग | उरूळी देवाची | संपुर्ण गांव |
| | | येवलेवाडी | संपुर्ण गांव |
| | | फुरसुंगी | संपुर्ण गांव |
| | | महम्मदवाडी | संपुर्ण गांव |
| | | उंड्री | संपुर्ण गांव |
| | | जांभुळवाडी | संपुर्ण गांव |
| | | मंतरवाडी | संपुर्ण गांव |
| | | कात्रज | अंशत: |
| | | धनकवडी | अंशत: |
| | | आंबेगांव खु. | अंशत: |
| | | आंबेगांव बु. | अंशत: |
| | | कोंढवे खु. | अंशत: |
| | | कोंढवे बु. | अंशत: |
| ३) | गुलाबी रंग | तळ टिप पहावी. | |
| ४) | हिरवा रंग | पुणे महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये नाही. | |

**टिप :-** वरील प्रमाणे दर्शविण्यात आलेल्या गावांच्या हद्दी व्यतिरिक्त पुणे महानगरपालिकेची संपुर्ण हद्द ही सी.सी.झेड.एम. मधील गुलाबी रंगाने दर्शविण्यात आलेल्या भागामध्ये येते, असे समजण्यात यावे. ज्या गावांच्या हद्दीबाबत अंशत: असा शेरा आहे, तेथील प्रकरणे बांधकाम परवानगीसाठी दाखल करतेवेळी पुणे महानगरपालिकेच्या बांधकाम विकास विभागातील संबंधीत इमारत निरीक्षक यांचेकडे संपर्क साधून खात्री करून घ्यावी.

पुणे महानगरपालिकेतर्फे लाल रंगाने दर्शविण्यात आलेला भाग सोडून इतर विभागामधील मिळकतींसाठी समुद्र सपाटी पासून उंची बाबतचे प्रमाणपत्र अदा करणेत येते. त्याचा नमूना **जोडपत्र पी२** म्हणून सोबत जोडण्यात आलेले आहे.

लाल व निळ्या रंगाने दर्शविणेत आलेल्या विभागातील जमिनीच्या उंचीबाबतचे प्रमाणपत्र हे शासनाकडील अधिकृत संस्था जसे पी.डब्ल्यु.डी, सी.पी.डब्ल्यु.डी , किंवा शासन मान्य इतर संस्थेकडून प्राप्त करून घ्यायचे आहेत व ते पुणे महानगरपालिकेतर्फे प्रमाणित करून घ्यावयाचे आहे. जमिनीच्या उंची प्रमाणपत्राबाबत सद्यस्थितीत पुणे महानगरपालिकेकडे मोनार्च सर्व्हेअर्स ॲन्ड इंजिनीयरींग कन्सल्टंस् प्रा.लि. यांचेकडून कार्यवाही होत आहे.

<u>पुणे महानगरपालिकेकडे उंची बाबतचे प्रमाणपत्र मिळणेसाठी अवलंबण्याची कार्यपध्दती</u>

**अ) सी.सी.झेड.एम.नकाशामधील गुलाबी किंवा पिवळ्या रंगाने बाधीत होणाऱ्या मिळकतींसाठी अवलंबवयाची कार्यपध्दती**

१) सी.सी.झेड.एम.नकाशा प्रमाणे जर मिळकत लाल किंवा निळा विभाग सोडून इतर विभागात येत असेल तर अर्जदाराने ला.आर्किटेक्ट मार्फत आवेदन पत्राव्दारे उप अभियंता बांधकाम विकास विभाग यांचेकडे सादर करावयाचा आहे. सादर करावायाच्या अर्जासोबत खालील कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

१) अर्जदाराचे संपुर्ण नाव, पत्ता, मोबाईल क्र., इमेल आय.डी. इ.
२) मिळकतीचा ७/१२ उतारा .
३) मिळकतीचे अक्षांश व रेखांश
४) मिळकत कुठल्या विभागात येते. (गुलाबी/पिवळा इ.)
५) मिळकतीचे समुद्र सपाटीपासूनची उंची .
६) बांधकाम करण्यात येणाऱ्या इमारतीची संपुर्ण उंची व ती उंची दर्शविणारा इमारतीचा सेक्शन नकाशा.
७) मिळकतीचे एन.डी.ए./लोहगांव विमानतळापासूनचे अंतर
८) टोपो शिट व त्यावर इमारतीचे स्थळ दर्शविण्यात यावे.

**ब) सी.सी.झेड.एम.नकाशामधील लाल किंवा निळ्या रंगाने बाधीत होणाऱ्या किंवा गुलाबी, पिवळ्या रंगामधील समुद्र सपाटीपासून ६३७ मी. पेक्षा जास्त उंची असलेल्या जमिनीसाठी अवलंबवयाची कार्यपध्दती–**

बांधकाम परवानगी मागण्यात आलेली मिळकत जर लाल किंवा निळ्या रंगांने दर्शविण्यात आलेल्या विभागामध्ये किंवा गुलाबी ,पिवळ्या रंगामधील समुद्र सपाटीपासून ६३७ मी. पेक्षा जास्त उंची असलेल्या जमिनीवर प्रस्तावित असेल तर शासनाकडून नियुक्त केलेल्या संस्था जसे पी.डब्ल्यु.डी., सी.पी.डब्ल्यु.डी. किंवा शासन मान्य संस्थेकडून प्राप्त करून सदर प्रमाणपत्र पुणे महानगरपालिकेकडे सादर करावे. सदरचे प्रमाणपत्र पुणे महानगरपालिके तर्फे संबंधीत इमारत निरीक्षक व उप अभियंता यांचेमार्फत छाननी करून ते नव्याने **<u>जोडपत्र पी२</u>** प्रमाणे जमिनीच्या उंची बाबतचे प्रमाणपत्र जारी करतील. हे प्रमाणपत्र हवाईदल विभागाकडे नाहरकत प्रमाणपत्र मिळणेसाठी करावयाच्या अर्जासोबत जोडावयाचे आहे. प्रत्यक्षात संरक्षण विभागाकडे सादर करण्यात आलेला अर्जाचा नमूना **<u>पी३</u>** सुलभ माहितीसाठी सोबत जोडलेला आहे.

भारतीय हवाई दल विभागाकडे नाहरकतपत्र मिळणेसाठीची कार्यपध्दती संकेतस्थळ https://164.100.59.173/sites/default/files/NOC_construction_helipad_greenfield_airfield.pdf वर उपलब्ध आहे. सदर संकेतस्थळावर उपलब्ध माहिती, कार्यपध्दती/अर्जाचा नमूना इ. सुलभ

संदर्भासाठी <u>**पी४**</u> नमूना खालील प्रमाणे आहे. तसेच संरक्षण विभागाद्वारे देण्यात आलेला नाहरकत प्रमाणपत्राचा नमूना सोबत जोडपत्र क्र.**पी५** सोबत जोडलेला आहे.

संरक्षण विभागाकडे नाहरकतपत्रासाठी अर्ज सादर करताना सदर अर्ज चार प्रतिंमध्ये तयार करावयाचा आहे. सदर अर्जापैकी १) मुळ प्रत व २) खरी नक्कल (true copy notarized) खालील पत्त्यावर पाठविण्यात यावे.

**Command Air Traffic Control Officer(CATCO)**
Headquarters South Western Air Command,
Vayu Shakti Nagar (VSN), Chiloda,
Gandhinagar, Pin-382042
Tele: 07923242600/Extn 5229 (Query Timings 1200-1300 h)

तसेच उर्वरीत दोन प्रती खरी नक्कल (true copy notarized)खालील पत्त्यांवर प्रत्येकी एक प्रमाणे पाठविण्यात याव्यात.

**The Wing Commander,**
Senior Air Traffic Control Officer,
For Air Officer Commanding, Air Force Station,
Lohegaon, Pune - 411032.
Tele: 020 26699568.

**Officer In Charge NOC**
Air Traffic Control,
Air Force Training Team
National Defence Academy
Pune- 411023.
Tele: 020 25291700 Extn – 2430( 0800 to 1400 hrs. ).

वरील प्रमाणे संरक्षण विभागाकडे अर्ज सादर करीत असताना खालील बाबींची काळजी घेण्यात यावी.

१) अर्ज संपुर्ण माहिती व तपशील इंग्रजी भाषेमध्ये असावेत.
२) अर्जामधील पत्ता, पिनकोडसह लिहलेला असावा.
३) अर्जामध्ये अर्जकर्त्याने ठिकाण व दिनांक इंग्रजी भाषेमध्ये स्पष्ट लिहावेत.
४) अर्जासमावेत नमूद केल्याप्रमाणे आवश्यक कागदपत्रे साक्षांकित केलेली व्यवस्थितपणे जोडलेली असावी व त्यावर पानवारी (Numbering) केलेली असावीत